# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ | वर्ष २ रे | अंक ५० किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१८०० : व्हल्कनायझेशन शोधणारे चार्लस गुडइयर यांचा जन्म झाला.

१९०० : दिनानाथ मंगेशकर यांचा जन्म झाला.

१९६५ : मद्रास आवडी या गावी भारतीय बनावटीचा पहिला रणगाडा तयार करण्यात आला.

१९८५ : आंतरराष्ट्रीय नाणेनिधी कार्यान्वित झाली.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ८५,०४१.४५ | -३६७.२५(०.४३%) |
| डॉलर | ₹ ८९.८१ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | २९ | १३ |
| दिल्ली | २१ | ०८ |
| मुंबई | ३२ | १९ |
| नागपूर | २८ | १२ |
| पुणे | ३० | ११ |

**सुविचार**

वेळेचा आदर करा, कारण वेळ गमावली की ती पुन्हा परत येत नाही.

**सुर्योदय - सुर्यास्त**

स.-७:०४ संध्या-५:५६

**सोने - चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,४१,९२५/- २,५१,०००/-

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०

पिल बाग : २५१ ते २७०

कांदे बाग : ----

# जळगाव मनपात भाजप-शिवसेनेचे बिनसले?

## गेल्या पंचवार्षिक निवडणुकीच्या पुनरावृत्तीची शक्यता

प्रतिनिधी । जळगाव

**महापालिकेची निवडणूक युतीच्या माध्यमातून निवडणूक लढण्यावर भाजपसह शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) एकमत झाले असले, तरी जागा वाटपाचा तिढा अजुनही सुटलेला नाही. विशेषत: भाजप-शिवसेनेत जोरदार रस्सीखेच सुरू असल्याने महापालिकेच्या निवडणुकीत यंदाही गेल्या पंचवार्षिक निवडणुकीची पुनरावृत्ती होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होताच राजकीय हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर, महायुतीतील तिन्ही प्रमुख घटक पक्षांनीही एकत्रितपणे ही निवडणूक लढवण्याचा निर्णय जवळपास अंतिम केला असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. या निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळेल, असा ठाम विश्वास भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केला आहे. एकूण ७५ जागांपैकी तब्बल ६५ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी होतील, असा दावा त्यांनी केला आहे. महायुतीतील समन्वय, संघटनात्मक ताकद आणि विकासाच्या मुद्द्यांवर मिळणारा जनतेचा पाठिंबा यामुळे हा विजय निश्चित असल्याचे महाजन यांनी नमूद केले आहे.


गेल्या निवडणुकीत भाजपचे ५७ तर शिवसेनेचे १८ नगरसेवक निवडून आले होते. त्या तुलनेत यंदा परिस्थिती वेगळी आहे. दोन्ही पक्ष परस्पर तडजोडीस तयार आहेत. याशिवाय, अजित पवार गटाला काही जागा सोडण्यास भाजप आणि शिंदे सेना तयार असल्याचे वक्तव्य मंत्री गिरीश महाजन यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना केले होते. (पान २ वर)

### ➤ नाशिकमध्ये भाजपला हव्यात सर्वाधिक जागा, अन्यथा स्वबळावर लढणार

**नाशिक** - येथे महायुतीमधील मित्रपक्षांनीही आपला दावा ठाम ठेवला आहे. भाजपने ८५ जागा, शिंदे सेना ४५ जागा तर अजित पवार गट (राष्ट्रवादी) ३० जागांवर दावा केला आहे. विशेष म्हणजे, या तीनही पक्षांच्या मागण्यांची बेरीज १६० वर जाते, तर उपलब्ध जागा फक्त १२२ आहेत.यामुळे जागावाटपाचा तिढा सुटणे कठीण झाले आहे. शिंदे सेनेने नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकांमध्ये जिल्ह्यात चांगली कामगिरी केल्याने ते ४५ जागांवर अडून बसले आहेत.२०१७ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपने थेट ६६ जागा जिंकून नाशिकचा गड सर केला. आताच्या परिस्थितीत, नाशिकमध्ये भाजपची संघटनात्मक ताकद मोठी असली तरी, शिंदे गटाकडे गेलेले जुने शिवसैनिक आणि छगन भुजबळांच्या रूपाने राष्ट्रवादीची (अजित पवार गट) असलेली ताकदही मोठी आहे.त्यामुळे सुनील केदार म्हणतात त्याप्रमाणे, भाजप शेवटच्या क्षणापर्यंत मित्रपक्षांना सोबत घेण्याचा प्रयत्न करेल. मात्र, जागावाटप न सुटल्यास भाजपने १२२ ही जागांवर स्वतंत्र लढण्याची तयारीही सुरू केली आहे. त्यामुळे आता नाशिकमध्ये पुढील काळात काय होतं याकडे सर्वांचं लक्ष लागलेलं आहे.

### ➤ गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत जागा वाटपावरूनच बिनसले

**जळगाव महापालिकेच्या गेल्या वेळी झालेल्या निवडणुकीतही भाजप आणि शिवसेना जागा वाटपासंदर्भात अखेरपर्यंत एकमत न झाल्याने एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले होते. अर्थात, त्यावेळी भाजपने ७५ पैकी ५७ जागांवर विजय मिळवून महापालिकेत निर्विवाद बहुमतही मिळवले होते. तशीच परिस्थिती आता भाजप आणि शिंदे गटात निर्माण झाली आहे.**



### महाविकास आघाडीची जागा वाटप...

**जळगाव महानगरपालिका निवडणुकीच्या पाशर्श्वभुमीवर महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेले शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)ची बैठक रविवारी (दि.२८) पार पडली. या बैठकीत दोन्ही पक्षांमध्ये सकारात्मक चर्चा होवून शिवसेनेला ३८ तर राष्ट्रवादीला ३७ जागा देण्यावर एकमत झाले. निवडणुकीत मनसे आणि काँग्रेसला सामावून घेणार असल्याची माहिती दोन्ही पक्षाच्या नेत्यांकडून पत्रकार परिषदेत देण्यात आली.**

### ➤ ...अन्यथा शिवसेना, राष्ट्रवादी स्वबळावर लढणार

**उमेदवारी अर्ज करण्याची मुदत दोन दिवसांत संपण्याची वेळ आली तरी दोन्ही-तिन्ही पक्षांचे जागा वाटप ठरलेले नाही. भाजप ५० पेक्षा कमी जागा लढण्यास तयार नसल्याने, शिंदे गट आणि अजित पवार गट देखील मागे हटण्यास तयार नाही. एकूण चित्र लक्षात घेता भाजप ५० जागांवर अडून बसल्यास शिंदे गटासह अजित पवार गट तडजोडीची भूमिका न स्वीकारता स्वबळावर निवडणूक लढवू शकतात. तसे झाल्यास महापालिकेच्या निवडणुकीत मोठी चुरस निर्माण होईल, असे बोलले जात आहे.**

## थोडक्यात



### खो-खो खेळाडूंना 'अर्जुन'साठी डावलले

**पुणे ।** क्रीडा क्षेत्रातील देशातील सर्वोच्च 'अर्जुन' क्रीडा पुरस्कारांसाठी खो-खो खेळातील महाराष्ट्राच्या पात्र खेळाडूंना वगळून राजस्थानच्या निर्मला भाटी यांची शिफारस केल्याबाबत महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेने आक्षेप नोंदवला आहे. पुरस्कारासाठी शिफारशी जाहीर झाल्यानंतर त्यावर ऑनलाइन पद्धतीने हरकत नोंदवली असून, पंतप्रधानांच्या तक्रार निवारण संकेतस्थळावरही तक्रार नोंदवल्याचे संघटनेचे सचिव चंद्रजित जाधव यांनी सांगितले.

### युती, आघाडीचा घोळ संपेना!

**मुंबई ।** उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दोन दिवसांची मुदत शिल्लक असतानाही अद्याप महायुती किंवा महाविकास आघाडीत मुंबईसह बहुतेक महापालिकांमध्ये सहमती घडू शकलेली नाही. पुण्यात शरद पवार- अजित पवार एकत्र येण्याची चर्चा सुरू झाली होती, पण जागावाटपावरून तेथेही फिसकटल्यातच जमा असल्याचे बोलले जात आहे. मुंबई, ठाण्यात भाजप आणि शिवसेना शिंदे गटात रस्सीखेच सुरू आहे. जागावाटपावरून नाराजीनाट्य, राजीनामे, घोषणाबाजीला काही शहरांमध्ये सुरुवात झाली आहे. महायुती किंवा महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी जादा जागांची मागणी केल्यानेच गोंधळ वाढला आहे. हा घोळ मिटत नसल्यानेच सर्वच पक्षांनी स्वबळाची तयारी सुरू केली आहे.

## मुंबईत काँग्रेस-वंचित बहुजन आघाडीच्या युतीची अधिकृत घोषणा



वृत्तसंस्था । मुंबई

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकींची घोषणा झाल्यानंतर राजकारणात घडामोडींना वेग आला आहे. महापालिकांच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान तर १६ जानेवारीला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. त्या अनुषंगाने राजकारणात घडामोडी सुरू आहेत. मुंबईत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी युतीची घोषणा केलेली आहे. त्यानंतर आता मुंबईत काँग्रेस आणि वंचित बहुजन (पान २ वर)

### ● कोण किती जागा लढवणार?

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी मुंबईत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्या युतींच्या माध्यमातून मुंबई महापालिकेच्या २२७ जागांपैकी वंचित बहुजन आघाडी ६२ जागा लढवणार असल्याची घोषणा संयुक्त पत्रकार परिषदेत करण्यात आली आहे.

# महावितरणचा शॉक!

## खान्देशातील मोठ्या थकबाकीदारांचे कनेक्शन कापण्यासाठी आता पोलिस बंदोबस्त

प्रतिनिधी । जळगाव

**खान्देशातील जळगावसह धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यात वीज बिल थकबाकीचा डोंगर वाढत चालल्याने महावितरणने आक्रमक वसुली मोहीम हाती घेतली आहे. वारंवार सूचना व आवाहन करूनही वीज बिल न भरणाऱ्या तब्बल सहा हजार ग्राहकांचा वीजपुरवठा चालू डिसेंबर महिन्यात खंडित करण्यात आला आहे. येत्या काळातही थकबाकीदारांवरील कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे.**



(फोटो सोर्स-इंटरनेट)

महावितरणच्या जळगाव परिमंडलात सध्या थकबाकीचे संकट गंभीर स्वरूप धारण करत आहे. कृषी वर्गवारी वगळता तिन्ही जिल्ह्यांतील सुमारे साडेसहा लाख लघु दाब ग्राहकांकडे महावितरणची तब्बल ११०३ कोटी २३ लाख रुपयांची थकबाकी आहे. पैकी जळगाव जिल्ह्यात ५५६ कोटी ५३ लाख, धुळे जिल्ह्यात ३२२ कोटी १० लाख, तर नंदुरबार जिल्ह्यात २२४ कोटी ६० लाख रुपये इतकी थकबाकी आहे.

धक्कादायक बाब म्हणजे अनेक ग्राहकांनी गेल्या वर्षभरात एक रुपयाचाही भरणा केलेला नाही. वाढता विरोध आणि राजकीय दबाव लक्षात घेता, जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता आय. ए. मुलाणी यांनी मुजोर ग्राहकांविरोधात थेट पोलीस बंदोबस्तात कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. परिमंडलातील सर्व अभियंत्यांना कोणत्याही दबावाला बळी न पडता कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

थकबाकी वसुलीसाठी महावितरणने स्वतंत्र विशेष पथके तयार केली आहेत. काही संवेदनशील भागांत कर्मचाऱ्यांना विरोध होण्याची शक्यता असल्याने, तेथे पोलीस बंदोबस्तातच वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई केली जाणार आहे. गुंडगिरी, धमक्या किंवा राजकीय हस्तक्षेप सहन केला जाणार नाही, असेही महावितरणने स्पष्ट केले आहे. महावितरणकडून वेळोवेळी थकबाकीदारांना वीजबिल भरण्याचे आवाहन केले जात असते. मात्र, तरीही प्रतिसाद न देणाऱ्या सहा हजार ग्राहकांचा वीजपुरवठा डिसेंबरमध्ये खंडित करण्यात आला. विशेष म्हणजे, वीजपुरवठा खंडित होताच हेच ग्राहक काही तासांत पैशांची जमवाजमव करून वीजबिल भरत असल्याचे चित्र दिसून आले. त्यानंतर महावितरणकडून पुन्हा वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.

### मोठ्या थकबाकीदारांची नावे जाहीर होणार

**जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यात अनेक श्रीमंत व्यक्तींकडे लाखो रुपयांचे वीज बिल थकीत आहे. नोटीस देऊनही भरणा न केल्याने आणि कारवाईसाठी गेलेल्या कर्मचाऱ्यांवर राजकीय वजन वापरण्याचे प्रकार वाढल्याने, अशा बड्या थकबाकीदारांची नावे स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्याबाबत महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक नुकतीच पार पडली. ऐन निवडणुकीच्या काळात थकबाकीदारांची नावे जाहीर झाल्यास सामाजिक दबाव निर्माण होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर महावितरणने मनपा प्रशासनालाही पत्र देऊन उमेदवारांना थकबाकी भरण्याचे आवाहन केले आहे.**

# तलावडी शिवारात शॉकसर्किटने ऊस जळून खाक

## सहा एकर क्षेत्रातील ऊस जळून नऊ लाखांचे नुकसान

प्रतिनिधी । तळोदा

**तालुक्यातील तलावडी शिवारात गट क्रमांक ९४ क्षेत्रात, काढणीला आलेला, ऊसात वीज तारा तुटून शॉक सर्किट होऊन, सहा एकर क्षेत्रातील ऊस जळून खाक झाल्याची घटना घडली. असून सुमारे ९ लाखाचे नुकसान झाले आहे. तळोदा पोलिसात अग्नी उपद्रवाची नोंद करण्यात आली आहे.**





तळोदा येथील शेतकरी शशिकांत लक्ष्मण सूर्यवंशी यांच्या गट क्रमांक ९४ मधील कापणीला आलेला, उसाचा क्षेत्रातून वीज मंडळाचा वीज तारा गेल्या असून, वीज तारा जीर्ण झाल्या आहेत. वीज खांबावरील दोन वीज तारा तुटून पडल्याने शॉक सर्किट होऊन उसाचा क्षेत्राला आग लागली सहा एकर क्षेत्रातील ऊस सुमारे ९ लाख रुपये किमतीचा ऊस जळाल्याने शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. याबाबत पोलिसात खबर दिल्यावरून अग्नी उपद्रवाची नोंद करण्यात आली आहे. वीज मंडळाने पंचनामा केला, असून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## विहिरीतून मोटार काढताना विजेचा धक्का; बापलेकासह चार जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था । छ. संभाजीनगर

**शेतातील विहिरीत असलेली पाणबुडी मोटार काढताना विजेचा जोरदार धक्का लागून चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथे शनिवारी दुपारी ही घटना घडली. या धक्क्यामुळे मृत्यू पावलेल्या मृतांमध्ये बाप लेकासह दोन मजुरांचा समावेश आहे. या दु:खद घटनेमुळे केशेगाव आणि परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.**


(फोटो सोर्स-इंटरनेट)

तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथे गणपती भिवाप्पा सावरे यांच्या शेतात शनिवारी दुपारी विहिरीवरील काम सुरू होते.

विहिरीतील पाणबुडी मोटार यंत्राच्या सहाय्याने बाहेर काढण्याचा प्रयत्न केला जात होता. पाणबुडी बाहेर काढत असताना अचानक क्रेन गरजेपेक्षा जास्त उंच उचलण्यात आली. परिणामी वरून जात असलेल्या विद्युत तारांना त्याचवेळी क्रेनचा वरील भाग चिकटला. क्रेनचा तारांना स्पर्श होताच तारांमधील विद्युत प्रवाह क्रेनमध्ये उतरला. शेतातून जाणाऱ्या महावितरणच्या तारांमधील विद्युत प्रवाहाचा जोरदार झटका (पान २ वर)

# संमिश्र



## थोडक्यात

### वंदे मातरम @ १५० दिनदर्शिकेचे प्रकाशन

**जळगाव ।** भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतीची मशाल पेटवणाऱ्या 'वंदे मातरम' या राष्ट्रमंत्राला १५० वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून भाजप जिल्हा सरचिटणीस डॉ.केतकी पाटील यांनी निर्मित केलेल्या 'वंदे मातरम @१५०' या विशेष दिनदर्शिकेचे प्रकाशन आज राज्याचे ग्रामविकास व आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन यांच्याहस्ते जी.एम. फाउंडेशन कार्यालयात शनिवारी करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर आ.राजूमामा भोळे, आ.मंगेश चव्हाण, डॉ.राजेंद्र फडके, माजी महापौर नितीन लढ्ढा, महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, पश्चिमचे जिल्हाध्यक्ष डॉ.राधेश्याम चौधरी, पूर्वच्या सरचिटणीस डॉ.केतकी पाटील, पणन महासंघाचे उपाध्यक्ष रोहित निकम आदी मान्यवर उपस्थित होते.

### बालविश्व शाळेत स्नेहस्मेलन उत्साहात

**जळगाव ।** महिला शक्तीचा जागर आणि भारताच्या दैदिप्यमान इतिहासापासून आधुनिक कर्तृत्वापर्यंतचा प्रवास उलगडणारे पुनर्जागरूक भारत हे विशेष स्नेहस्मेलन बालविश्व शाळेत उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी झाशीच्या राणीपासून ते कल्पना चावलापर्यंतच्या विविध महान महिलांच्या वेषभूषा साकारून उपस्थितांना भारत जागृत करण्याचा संदेश दिला. स्नेहस्मेलनाचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेली रणरागिणींची शौर्यगाथा होती. यात झाशीची राणी लक्ष्मीबाई आणि राणी पद्मावती यांच्या बलिदानाची आठवण करून देण्यात आली. त्याचप्रमाणे, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पोलिस अधिकारी किरण बेदी आणि अंतराळवीर कल्पना चावला यांच्या वेशभूषा करून आधुनिक भारतातील महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव केला.

# गड-किल्ले हे स्वराज्याचे खरे योद्धे

## ● शिवदुर्ग महोत्सवात आयोजित व्याख्यानात वास्तुविशारद वरुण भामरे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या लष्करी साम्राज्याचे प्रतीक म्हणजे किल्ले होते आणि हे किल्ले स्वराज्याचे खरे योद्धे आहेत असे प्रतिपादन किल्ले रायगडचे जतन-संवर्धन करणारे वास्तूविशारद वरुण भामरे यांनी केले.**

रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्टतर्फे शिवदुर्ग महोत्सव पर्व-१ निमित्त मायादेवी नगरातील रोटरी भवन येथे 'दुर्ग स्थापत्य, जतन आणि संवर्धन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी माजी अध्यक्ष नितीन रेदासनी, अध्यक्ष गौरव सफळे, सचिव देवेश कोठारी, प्रकल्प संकल्पना तुषार तोतला आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना भामरे यांनी, महाराजांच्या प्रत्येक किल्ल्यामागे वेगळा विचार आणि संकल्पना होती. जेव्हा दुर्ग मजबूत तेव्हाच स्वराज्य मजबूत अशी छत्रपतींची कार्य पद्धत होती, असे सांगून शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्रात दुर्गांची संकल्पना व महत्त्व विशद केले आहे. राज्यात ३५० किल्ले असून त्यातील काही किल्ले छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतः बांधले आहेत तर काही जिंकले आहेत, असेही ते यावेळी म्हणाले. दुर्ग म्हणजे किल्ला असे सांगून श्री.भामरे यांनी जलदुर्ग, गिरीदुर्ग, वनदुर्ग, धनुदुर्ग आदी किल्ल्यांचे प्रकार सांगितले. काही बांधकाम साहित्यावरूनही किल्ल्यांचे प्रकार आहेत. किल्ल्यांचा घेरा, चौक्या, कडा, तटबंदी, बुरुज, दरवाजे, नगारखाने या विषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून रायगड किल्ल्यावर सुरू असलेल्या जतन-संवर्धनाचे कार्य भामरे यांनी सांगितले. परिचय देवांशी कोठारी यांनी करुन दिला. सूत्रसंचालन माजी अध्यक्ष सरिता खाचणे यांनी केले तर आभार प्रेसिडेंट इलेक्ट योगेश राका यांनी मानले.



■ **किल्ले बनवा स्पर्धेचा** पारितोषिक वितरण सोहळा रोटरी भवनमध्ये पार पडला. याप्रसंगी रायगड प्राधिकरणाचे वास्तू विशारद वरूण भामरे, माजी अध्यक्ष नितीन रेदासनी, अध्यक्ष गौरव सफळे, सचिव देवेश कोठारी, प्रकल्प संकल्पना तुषार तोतला उपस्थित होते.

### ■ शानबाग विद्यालय, राजे संभाजी ग्रुप प्रथम...

शिवदुर्ग महोत्सव पर्व-१ मध्ये किल्ले बनवा स्पर्धेत शालेय गटात ब.गो. शानबाग विद्यालयाने तर खुल्या गटात राजे संभाजी ग्रुपने प्रथम क्रमांक मिळवला. शालेय समूह गटात द्वितीय क्रमांक रोझलँड इंग्लिश मीडियम स्कूल तर तृतीय क्रमांक संस्कृती माध्यमिक विद्यालय यांनी मिळविला. उत्तेजनार्थ पारितोषिक रोझलँड इंग्लिश मीडियम स्कूलच्या गट क्रमांक ६ ला देण्यात आले. खुल्या गटात रायगड किल्ला साकारणाऱ्या गट क्रमांक तीनला द्वितीय पारितोषिक तर राजेशाही ग्रुपला तृतीय पारितोषिक मिळाले. सर्व विजेत्यांना रोख पारितोषिके व प्रशस्ती पत्र प्रदान करून गौरविण्यात आले. सहभागी सर्व स्पर्धकांना देखील प्रशस्तीपत्र देण्यात आले.

# मविआचं ठरल : ठाकरे गटाला ३८ तर राष्ट्रवादीला ३७ जागा

## ● दोन्ही पक्षाच्या नेत्यांची पत्रकार परिषदेत माहिती



प्रतिनिधी । जळगाव

**महानगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडीमधील घटक पक्ष असलेले शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) एकत्र निवडणूक लढणार असून शिवसेनेला ३८ तर राष्ट्रवादीला ३७ जागा मिळाल्या असल्याची माहिती दोन्ही पक्षाच्या नेत्यांकडून पत्रकार परिषदेत देण्यात आली.**

पत्रकार परिषदेला राष्ट्रवादीचे निवडणूक प्रभारी माजी आ.संतोष चौधरी, महानगराध्यक्ष एजाज मलिक, कार्याध्यक्ष संग्राम सूर्यवंशी, शिवसेना ठाकरे गटाचे संपर्क नेते संजय सावंत, जिल्हा प्रमुख कुलभूषण पाटील, माजी खा.उन्मेष पाटील, पारोळ्याचे माजी नगराध्यक्ष करण पवार, पीयूष गांधी आदी उपस्थित होते. पुढे माहिती देतांना, महाविकास आघाडीच्या रविवारी (दि.२८) झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा केली. यामध्ये शिवसेनेला ३८ जागा तर राष्ट्रवादी काँग्रेसला ३७ जागा देण्याबाबत आता एकमत झाले आहे. आम्ही एकत्रितपणे जागा लढवणार असून शिवसेना त्यांच्या कोट्यातून मनसेला तर राष्ट्रवादी काँग्रेस हे त्यांच्या कोट्यातून काँग्रेस व इतर समविचारी पक्षांना तिकीट देणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. जळगाव मनपावर महाविकास आघाडीचा झेंडा फडकणार असल्याचा आम्हाला विश्वास असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

# गरजूंना मदत केल्याने देशाच्या प्रगतीला हातभार लागतो

## ● पो.नि. सागर शिंपी यांचे प्रतिपादन; रुख्मिणी फांऊडेशन मिडटाऊनचे पदग्रहण उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**रुख्मिणी फांऊडेशन नेहमीच आवश्यक त्या ठिकाणी मदत करत असते. लोकांनी समाजकार्य केले पाहिजे, गरजूंना आवश्यक मदत केली पाहिजे, गरजूंना मदत केल्याने आपण व समाज पुढे जातो तसेच देशाच्या प्रगतीला आपला हातभार लागतो, असे मत शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर शिंपी यांनी व्यक्त केले.**

रुख्मिणी फांऊडेशन मिडटाऊनचा पदग्रहण सोहळा रविवार, दि.२८ रोजी पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उद्योजक आदेश ललवाणी, जितेद्र जैन आदी उपस्थित होते.

यावेळी माजी अध्यक्ष राजीव श्रॉफ यांनी नवीन अध्यक्ष रविंद्रसिंह राजपुत यांच्याकडे पदभार सोपवला. यावेळी कमलेश डांबरे यांनी वर्षभरातील कार्याचा आढावा सादर केला. रविद्रसिंह राजपुत यांनी सर्वाच्या मदतीने सामाजिक, शैक्षणीक, सांस्कृतीक व देशभक्तीचे कार्य करणार असल्याचे सांगीतले. आदेश ललवाणी यांनी, आवश्यक ती मदत करण्यास तयार असल्याचे सांगितले. जितेद्र जैन यांनी गरजुंना वाटप करण्यासाठी ९० स्वेटर देण्यात येतील, असे सांगितले. सुत्रसंचलन कमलेश डांबरे यांनी केले तर आभार पंकज जैन यांनी मानले. यावेळी मनीष वालेचा, राजेश भंडारी, जगदीशसिंह राजपुत यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



### ■ विविध खेळांचे आयोजन...


यावेळी संगीत खुर्चीसह विविध खेळ खेळण्यात आले. लहान मुलांच्या संगीत खुर्ची स्पर्धेत रिद्धी फुसेकरने प्रथम तर डिंपल राकाने द्वितीय क्रमांक पटकावला. संगीत बॉल स्पर्धेत परम राका, महिलांसाठीच्या संगीत खुर्ची स्पर्धेत रुपा वालेचा, ग्लास ठेवणे स्पर्धेत रवी राजपूत, राणी राजपूत, कमलेश डांबरे, राजेश भंडारी विजयी झाले. मान्यवरांच्याहस्ते यांना बक्षिस देवून गौरविण्यात आले.

# ...तर भारताला महासत्ता होण्यापासून कुणीच रोखू शकत नाही; स्वदेशी जागरण मंचच्या बैठकीत सुर

प्रतिनिधी । जळगाव

**स्वदेशी व स्वावलंबन या दोन संकल्पना आपण मनापासून स्विकारल्या तर भारताला महासत्ता होण्यापासून कुणीच रोखू शकत नाही, असा सुरु स्वदेशी जागरण मंचच्या देवगिरी प्रांतच्या बैठकीत उमटला.**

स्वदेशी जागरण मंच आणि स्वावलंबी भारत अभियान, देवगिरी प्रांतची प्रांत बैठक नुकतीच जळगाव येथे पार पडली. बैठकीचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभाग कार्यवाह स्वप्नील चौधरी यांच्या हस्ते झाले. यावेळी मंचावर प्रमुख अतिथी म्हणून स्वावलंबी भारत अभियानचे क्षेत्र समन्वयक विनय खटावकर, स्वदेशी जागरण मंचचे पश्चिम क्षेत्र संघटक मनोहरलाल अग्रवाल, प्रांत संयोजक शैलेश कंगळे, महिला कार्यप्रमुख योगिता माळवी उपस्थित होत्या. बैठकीदरम्यान जळगाव शहरातील पाच स्टार्टअप फाऊंडर्सचा सत्कार करण्यात आला. त्यांचे केळीची चिप्सपासून ड्रोन पर्यंतचे सादरीकरण विशेष आकर्षण ठरले. बैठकीला देवगिरी प्रांतातील सर्व जिल्हा संयोजक व सहसंयोजक उपस्थित होते. सुत्रसंचालन कमलेश सोनवणे यांनी केले तर आभार विशाल भोळे यांनी मानले. यशस्वीतेसाठी गिरिश बर्वे, अजिंक्य तोतला, निलेश वाणी, चेतन वाणी, तुषार भांबरे



# आरोहण क्रिकेट स्पर्धेत डॉ.उल्हास पाटील महाविद्यालयास विजेतपद

प्रतिनिधी । जळगाव

शासकीय होमिओपॅथिक महाविद्यालय व रुग्णालयातर्फे आयोजित 'आरोहण २०२५' आयुष इंटर कॉलेज क्रिकेट टूर्नामेंटमध्ये डॉ.उल्हास पाटील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या संघाने विजेतपद प्राप्त केले.

स्पर्धेत आयुष कॉलेजेसच्या अनेक संघानी सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात डॉ.उल्हास पाटील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजने यजमान शासकीय होमिओपॅथिक महाविद्यालयाच्या संघाचा पराभव करून स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. या विजयाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी खा.डॉ.उल्हास पाटील यांनी खेळाडूंचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संघाच्या या यशात प्राचार्य डॉ.आर.के. मिश्रा, क्रीडा शिक्षक व सहाय्यक प्रा.डॉ. प्रतिक पाटील, व्यवस्थापक राजीव जामोदकर आदी मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयातील इतर सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे या स्पर्धेसाठी मोलाचे सहकार्य लाभले.

# सेवादूत प्रकल्पाद्वारे घरपोच शासकीय सेवा

प्रतिनिधी । जळगाव

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सेवादूत प्रकल्पाअंतर्गत जळगाव जिल्ह्यातील नागरिकांना विविध शासकीय सेवा आता थेट घरपोच उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या अभिनव उपक्रमाचा लाभ जिल्ह्यातील सर्व नागरिकांना घेता येणार आहे.

दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच शासकीय कामासाठी प्रत्यक्ष आपले सरकार सेवा केंद्रावर जाणे शक्य नसलेल्या किंवा अर्ज प्रक्रियेबाबत माहिती नसलेल्या नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ सुलभपणे मिळवून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

# शिवसेनेच्या दिनदर्शिकेचे ना. गुलाबराव पाटील यांच्याहस्ते प्रकाशन

प्रतिनिधी । जळगाव

**समाजहिताच्या कार्याची जाणीव निर्माण व्हावी तसेच शिवसेना व युवासेनेच्या विकासात्मक उपक्रमांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने शिवसेना या विशेष दिनदर्शिकेचे लोकार्पण पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्याहस्ते करण्यात आले.**

शिवसेना तथा युवासेनेमार्फत जळगाव तालुक्यातील शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, युवक व महिला सक्षमीकरण, शेतकरी तथा नागरिकांच्या समस्या व त्या सोडवण्यासाठी राबवलेल्या उपक्रमांचा समावेश या दिनदर्शिकेत करण्यात आला आहे. शिवसेनेचे शांताराम सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेनेचे उपतालुका प्रमुख स्वप्निल सोनवणे यांच्या संकल्पनेतुन तयार केलेल्या व समाजाशी थेट संवाद साधणारे आणि कामाची जाणीव करून देणारे हे दिनदर्शिका मतदार संघातील नागरिकांमध्ये वितरित करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी कौतुक करुन शुभेच्छा दिल्या.



### ■ दिनदर्शिका पक्षाच्या सामाजिक कामाचा प्रवास

यावेळी बोलताना स्वप्निल सोनवणे यांनी, 'ही दिनदर्शिका म्हणजे शिवसेना व युवासेनेच्या सामाजिक कामाचा प्रवास आहे. नागरिकांप्रती असलेली जबाबदारी आणि भविष्यासाठीची विकासाची दृष्टी याचे प्रतिबिंब या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पुढील काळातही समाजहितासाठी सातत्याने काम करत राहण्याचा संकल्प आहे, असे सांगितले. या उपक्रमामुळे सामाजिक कार्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## पान १ वरुन

### जळगाव मनपात भाजप......

प्रत्यक्षात, रविवारी पार पडलेल्या भाजप आणि शिंदे गटाच्या बैठकीत कोणीच एक पाऊल मागे जाण्यास तयार झाले नाही. अजित पवार गटाने तर या बैठकीत साधा भाग सुद्धा घेतला नाही. जागा वाटपाची चर्चा निष्पळ ठरल्यानंतर शिंदे गटाचे नेते मंत्री गुलाबराव पाटील अर्ध्यातून निघून गेले. मंत्री महाजन देखील आले तसे नाशिककडे लागलीच रवाना झाले. त्यामुळे रविवारी युतीमध्ये जागा वाटपाचा कोणताच तोडगा निघाला नाही.

### विहिरीतून मोटार काढताना......

क्रेनला बसला. त्याचवेळी क्रेनच्या संपर्कात असलेल्या आणि विहिरीत काम करीत असणाऱ्या चौघांना विजेचा जोरदार धक्का बसला. हा धक्का इतका जोराचा होता की, चौघांचाही जागेवर मृत्यू झाला. या दुर्घटनेत एकाच बापलेकासह कामासाठी आलेल्या दोन मजुरांचा समावेश आहे. कासीम कोंडींबा फुलारी (वय ५४), रतन कासीम फुलारी (वय १६), रामलिंग साखरे (वय ३०), नागनाथ साखरे (वय ५५) अशी मृतांची नावे आहेत. एकाच वेळी काळाने चार जणांवर झडप घातल्याने केशेगाव आणि परिसरावर दुःखाचे सावट पसरले आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून रात्री उशीरपर्यंत पंचनामाबाबत पुढील प्रक्रिया सुरू होती.

### मुंबईत काँग्रेस-वंचित......

आघाडीमध्ये युती झाली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि वंचित बहुजन आघाडीचे नेते धैर्यवर्धन पुंडकर यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत मुंबईत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्या युतीची अधिकृत घोषणा केली आहे. मुंबई महापालिकेच्या २२७ जागांपैकी वंचित बहुजन आघाडी ६२ जागा लढवणार असल्याचंही या संयुक्त पत्रकार परिषदेत जाहीर करण्यात आलं आहे. हर्षवर्धन सपकाळ काय म्हणाले? - 'काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची मुंबईत आघाडीची घोषणा करत असताना मला आनंद होत आहे. काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी या दोन्ही पक्षांची नैसर्गिक मैत्री आहे. कारण संविधानाला अभिप्रेत असणारा भारत घडवणं हा आमचा देखील राजकीय अजेंडा आहे आणि वंचित बहुजन आघाडीचा देखील हाच राजकीय अजेंडा आहे.काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीचं नातं चांगलं आहे', असं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. 'मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी समविचारी पक्षांना बरोबर घेण्याची काँग्रेसची भूमिका असल्याचं आम्ही सांगत होतो. आज आम्ही मुंबईत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्या युतीची घोषणा करत आहोत. तसेच राज्यात इतर २८ ठिकाणी युती करण्यासाठी देखील आमची चर्चा सुरू आहे. सकारात्मक निर्णय होईल. नगरपंचायतीच्या निवडणुकीत देखील काही ठिकाणी आम्ही एकत्र लढलो आहोत. आता आजपासून काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी हे दोन्ही पक्ष मित्र पक्ष म्हणून राहतील', असं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे.'आजपासून आम्ही एका नव्या अध्यायाला सुरूवात करत आहोत. आमची आघाडी ही सत्तेसाठी नाही तर विचारांची आहे. भारतातील पुरोगामी विचार आणि संविधानाची मूल्ये जपण्यासाठी आम्ही पुढे जात आहोत. आगामी काळात आमची आघाडी परिवर्तन घडवेल, असा विश्वासही हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला.

# कानात वस्तू घालणे टाळा; तातडीने तपासणी करा!

## ● डॉ.अनुश्री अग्रवाल यांनी दिला नागरिकांना सल्ला

प्रतिनिधी । जळगाव

**कानात मळ जमा होणे किंवा घरीच काहीतरी घालून तो काढण्याचा प्रयत्न करणे धोकादायक असू शकते, ज्यामुळे कानाचे आरोग्य धोक्यात येते. कानात वस्तू घालून त्याच्याशी खेळणे थांबवा. हे त्रासदायक होऊ शकते. यासाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे, असा सल्ला कान-नाक-घसा तज्ज्ञ तथा महादेव हॉस्पिटल येथील विभागप्रमुख डॉ. अनुश्री अग्रवाल यांनी दिला.**



शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या आकाशवाणी चौकातील महादेव हॉस्पिटल येथे कान-नाक-घसा विभागात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध झालेल्या असून याबाबत डॉ. अनुश्री अग्रवाल यांनी माहिती देतांना त्या बोलत होत्या.

पुढे बोलतांना डॉ.अग्रवाल यांनी, लहान मुलांमध्ये कानाचे संक्रमण खूप सामान्य आहे. बाहेरचा किंवा मधला कान संक्रमित होऊ शकतो, ज्यामुळे द्रव साठणे आणि वेदना होऊ शकते. लवकर उपचार महत्त्वाचे आहेत, ऐकणे कमी होणे हा एक गंभीर मुद्दा आहे आणि दीर्घकाळ इअरफोन वापरणे, मोठा आवाज ऐकणे यामुळे ऐकण्याची क्षमता कमी होऊ शकते. यासाठी योग्य काळजी घेणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले.

### ■ काळजी घेण्याबाबत दिल्या टिप्स



वारंवार कान दुखत असल्यास किंवा स्राव येत असल्यास डॉक्टरांना भेटा. इअरफोनचा वापर मर्यादित करा आणि आवाजाची पातळी कमी ठेवा. कानामध्ये पिन किंवा इतर टोकदार वस्तू घालू नका. कानाच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेले जीवनसत्त्वे आणि खनिजे आहारात समाविष्ट करा, अशा टिप्स डॉ. अग्रवाल यांनी दिल्या. त्रास जाणवल्यास नागरिकांनी उपचार करावा, असे आवाहनही त्यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

# ला.ना. विद्यालयात बक्षीस वितरण उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शेठ ला.ना. सार्वजनिक विद्यालयात किशोर महोत्सवचा समारोप बक्षीस वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.शरदचंद्र छापेकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम हेमंत पाटील उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक सचिन देशपांडे, ज्येष्ठ पर्यवेक्षक संजय वानखेडे, पर्यवेक्षिका रमा तारे, सुवर्णा वंजारी, स्मिता करे यांच्याहस्ते माता सरस्वतीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख अतिथींचा सत्कार करण्यात आला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### जयनगर ग्रामपंचायतीत पेसा दिवस साजरा

**जयनगर ।** आदिवासी भागातील ग्रामस्वराज्य अधिक सक्षम करण्यासाठी आणि पेसा कायद्याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने जयनगर ग्रामपंचायतीत पेसा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात पेसा कायद्याचे महत्त्व, ग्रामसभेला मिळणारे अधिकार तसेच यांवरील जल-जंगल-जमीन स्थानिक समुदायाचा हक्क याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामसभेची भूमिका बळकट अधिक करण्याचा संकल्प आला. यावेळी करण्यात कार्यक्रमास सरपंच मोगराज सोनवणे, गटनेते उपसरपंच ईश्वर माळी, ग्रामपंचायत अधिकारी बी.ए.पाटील, ग्रामपंचायत सदस्य शरद पाटील, मडकू पारधी, अजय मोरे, मंगलाबाई माळी, सुशीलाबाई पारधी, सिंधुबाई सहारे, लताबाई सोनवणे आदी उपस्थित होते. यासह ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्या होत्या.

### देवरे अभियांत्रिकीत फुटबॉल स्पर्धा

**धुळे ।** श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजीराव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे अंतर्गत जळगाव विभागीय फूटबॉल स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते त्यात धुळे जळगाव नंदुरबार व नासिक जिल्ह्यातील विविध आठ महाविद्यालयांचे दिडशे खेळाडू त्यांच्या संघातून सहभागी झाले होते. या स्पर्धेतून विभागीय संघाची निवड होणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हितेंद्र पाटील यांच्या हस्ते झाले, या प्रसंगी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील, साहित्य व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. वाघ, विभागीय संचालक डॉ शरतान चौधरी, डॉ. नरेश बागल, गोदावरी अभियांत्रिकीचे डॉ. जयंत जाधव, प्रा बी. एन. शिरसाठ, प्रा. योगेश चव्हाण, प्रा. डॉ जितेंद्र व्यास व देवरे अभियांत्रिकी चे क्रिडा संचालक प्रा. मनोज चौधरी उपस्थित होते.

# अक्राणी येथील जलसाक्षरता समितीचा दिल्लीत गौरव

**• जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांच्या हस्ते जलप्रहरी पुरस्कार प्रदान**

प्रतिनिधी । नंदुरबार

**दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात आयोजित समारंभात नंदुरबार जिल्ह्यात लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या अक्राणी येथील जलसाक्षरता समितीच्या जलसंवर्धन कार्याचा गौरव करण्यात आला.**




प्राचार्य डॉ.एच.एम. पाटील यांचा पर्यायाने जलसाक्षरता समिती अक्राणी व नमामि सातपुडा मिशन यांच्या कार्यास भारत सरकारचे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्या हस्ते जलप्रहरी २०२५ प्रदान करण्यात आला. यावेळी भरत पावरा, सुनील परमार, जलप्रहरी ॲड. संगीता एच. पाटील, निरुपम पाटील यांनी पुरस्कार स्वीकारला. देशभरातून निवड झालेल्या ३३ मान्यवरांमध्ये महाराष्ट्रातील केवळ ४ जणांचा समावेश आहे. त्यात डॉ. पाटील यांची निवड होणे ही नंदुरबार व सातपुडा परिसरासाठी अभिमानाची बाब आहे. कोरोना काळातही दुर्गम सातपुड्यात लोकसहभागातून कुकलटपाडा व निमझरी येथील जलसंधारणाचे कार्य जलक्रांती झाली.

दरम्यान, उभारलेल्या २१ वनराई बंधाऱ्यांमुळे २२५ हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्राला दुबार पीक, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता व महिलांच्या श्रमात लक्षणीय बचत झाली. या पुरस्कारामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे. हा पुरस्कार भविष्यातील जलसंवर्धन चळवळींसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास ॲड.संगीता पाटील यांनी व्यक्त केला.

### तळोदा येथे मराठा समाजाची बैठक उत्साहात

प्रतिनिधी । तळोदा

येथे मराठा समाज प्रबोधन मंडळ, मराठा समाज परिवर्तन चळवळ, महिला परिवर्तन चळवळ, युवा परिवर्तन चळवळ जिल्हा नंदुरबार यांच्यातर्फे आगामी राजमाता जिजाऊ जयंती उत्सव साजरा करण्याबाबत येथील आशापुरी माता मंदिरात बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीचे प्रास्ताविक धनराज पाचोरे यांनी केले. यावेळी मराठा समाज परिवर्तन चळवळीचे अध्यक्ष किशोर साळुंके यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बैठकीत राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम व विषयावर प्रत्यक्ष चर्चा करण्यात आली. मराठा समाज परिवर्तन चळवळीचे विठ्ठल मराठे यांनी राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्याविषयी मार्गदर्शन केले. राजमाता जिजाऊ यांची जयंती दि.११ जानेवारी २०२६ रोजी तळोदा येथे साजरी करण्याचे बैठकीत ठरविण्यात आले. बैठकीला मराठा समाज परिवर्तन चळवळीचे मुख्य समन्वयक विठ्ठल मराठे, अध्यक्ष किशोर साळुंके, आदी मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नंदुरबार जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनची सभा उत्साहात



प्रतिनिधी । नंदुरबार

**येथील जिल्हा पेन्शनस २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व मेळावा गांधीनगरमधील पेन्शनर भवनात मधुकर साबळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.**

प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा निवडणूक अधिकारी कल्पना ठुबे, जिल्हा कोषागार अधिकारी संजय खडसे, विजयसिंग पाटील, संदिप अहिरे, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन पुणेचे अध्यक्ष एन.डी. मारणे, कार्याध्यक्ष वसंतराव वाबळे, कोषाध्यक्ष वासुदेव साठे, सरचिटणीस सुभाष पवार, सचिव संपतराव तनपुरे, अहिल्यानगरचे अध्यक्ष द.मा.दुबे, ज्ञानदेव लंके, पोपटराव इथापे, महादेव गांगर्डे, छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष वसंतराव सबनीस, उपाध्यक्ष डॉ. अरविंद देशमुख, नाशिकचे अध्यक्ष बाळासाहेब खैरनार, धनराज वाणी, बाजीराव देसले, राजेंद्र बागुल, साहेबराव अहिरे सांगलीचे अध्यक्ष आर.बी.पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमात प्रा. ॲड. पी.एन. देशपाडे, प्राचार्य बी.एस. पाटील, प्रभाकर भावसार यांचेसह ११ जणांना जीवन गौरव तर मोहियोद्दीन कुरेशी, पुष्पाबाई शेवाळे यांच्यासह ८ जणांना सेवा भावी पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन होऊन कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

# आविष्कार स्पर्धेत ४२ प्राध्यापक, विद्यार्थ्यांची विद्यापीठस्तरावर निवड

प्रतिनिधी । शिरपूर

**आर.सी. पटेल आयएमआरडी परिसंस्थेतील ४२ प्राध्यापक व विद्यार्थ्यांची अविष्कार स्पर्धेत विद्यापीठस्तरावर निवड झाली आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाद्वारे जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.**



अविष्कार स्पर्धेद्वारे विद्यार्थी आपल्या विविध संशोधन व नाविन्यपूर्ण संकल्पनांना यशस्वीरित्या सादर करून आपले कौशल्य सादर करतात. अविष्कार स्पर्धा ही विद्यार्थी व संशोधक प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या संकल्पनेला एक नवीन दिशा देण्याचे काम करते. अविष्कार स्पर्धेचे उद्धिष्ट विद्यार्थ्यांमधील संशोधक गुणांना वाव देणे हे होते. आयएमआरडी परिसंस्थेमधील विद्यार्थी व संशोधक प्राध्यापक विद्यार्थ्यानी जिल्हास्तरावर सहभाग नोंदवला. जिल्हास्तरीय फेरीमधून विद्यापीठस्तरीय स्पर्धेसाठी पदव्युत्तर पदवी गटामधून परिसंस्थेतील प्रा. छाया पाटील, प्रा. मिलिंद पाटील या संशोधक प्राध्यापकांची निवड करण्यात आली. तसेच पदवी गटामधून भूपेश पाटील, कार्तिक पाटील, जैनम जैन, साक्षी सिन्हा, खुशी पाली, ज्ञानेश्वरी पाटील, अथर्व पाटील, अनुष्का विंचूरकर, वांशिक देशमुख, साक्षी पाटील, कुणाल चौधरी, खुशवंत महाजन, हिमांशू आयोजन गिरासे, हेमराज जाधव, मिस्बाह शेख, कन्हैया पाटील, आदिल शेख, रुपेश कुमावत्त, प्रितेश अहिरे, अनिरुद्ध लांडगे, अंजली चव्हाण व पदवीलर गटामधून दर्शन चौधरी, तेजल बारी, गायत्री भदाणे, साक्षी पाटील, मयुरी सोनवणे, मिहिर चव्हाण, विपुल पाटील, योगेश दोडे, संकेत माळी, कुणाल साई, रेवती पवार, नंदिनी माळी, जगदिश पाटील, मोनिका पाटील, कार्तिक वाल्हे, केतना लोहार, कोमल चौधरी, चेतन पाटील, पूजा महाजन या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय आविष्कार निवड चाचणीमधून विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

### ग्राहकदिनानिमित्त स्पर्धा

प्रतिनिधी । शिंदखेडा

शहरातील एमएचएसएस महाविद्यालयात ग्राहक दिनानिमित्त वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. जिल्हा संघटक प्रा.डागा यांच्याकडून विजेत्यांना रोख बक्षीस देण्यात आले. सर्व प्रथम स्वामी विवेकानंद, साने गुरूजी, बिंदु माधव जोशी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांनी केले. प्रमुख वक्ते प्रा. डागा यांनी ग्राहकाला कसे नाडले जाते, त्यासाठी असणारे अधिकार मांडले.

# नूतन पाडवी विद्यालयात वीर बालदिवस

प्रतिनिधी । धुळे




शीख धर्माचे दहावे धर्मगुरु गुरु गोविंदसिंह महाराज यांचे वीर पुत्रांनी धर्मरक्षणासाठी दिलेल्या बलिदान प्रित्यर्थ श्री शिवाजी विद्याप्रसारक संस्थेचे नुतन पाडवी विद्यालयात वीर बाल दिवस साजरा करण्यात आलाअध्यक्षस्थानी बाजार समितीचे सभापती साहेबराव खैरनार हे होते.

धुळे जिल्हा भाजपाचे जिल्हा सरचिटणीस यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी बाजार समितीचे माजी सभापती बाजीराव पाटील, पं.स.चे माजी सभापती भगवान गर्दे, माजी सभापती संग्राम पाटील, माजी सभापती कैलास पाटील, माजी सरपंच चुनिलाल पाटील, धुळे गुरुव्दारा प्रमुख रणवीरसिंग, माजी पं.स. सदस्य रितेश परदेशी, कैलास पाटील, बापू खैरनार, हरिष शेलार, राकेश पाटील, निखील ठाकरे, प्रल्हाद मराठे, कमलेश भामरे उपस्थित होते. सूत्रसंचालन बी. सी. पाटील यांनी केले. आभार मनोज पाटीले यांनी मानले.

# तळोदा महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांची अग्निवीरपदी निवड

प्रतिनिधी । तळोदा



येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना एककातील दोन छात्रसैनिकांची भारतीय सेनेत अग्निवीर पदासाठी निवड झाल्याने महाविद्यालयाच्या यशस्वी परंपरेत शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

अग्निविर म्हणून निवड झालेल्या छात्रसैनिकांचा महाविद्यालयात गौरवपूर्ण सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. सत्कार समारंभात अध्यापक शिक्षण मंडळ संचलित कला, वाणिज्य महाविद्यालय ट्रस्टचे उपाध्यक्ष इंजिनियर रोहित माळी, महाविद्यालयाचे प्राचार्य तथा सचिव डॉ.एच.एस. दलाल यांच या हस्ते निवड झालेल्या छात्रसैनिकांना प्रमाणपत्र तसेच पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये भूषण प्रभाकर पाटील यांनी हैदराबाद येथे प्रशिक्षण पूर्ण करून त्यांची नियुक्ती सिलिगुडी पश्चिम बंगाल येथे झाली आहे.

रोहितसिंग विजयसिंग परदेशी यांनी बॉम्बे इंजिनिरिंग प्रशिक्षण अकादमी खडकी पुणे येथे प्रशिक्षण पूर्ण करून त्यांची नियुक्ती हातीगढ़ आसाम येथे झाली आहे. महाविद्यालयासाठी व राष्ट्रीय छात्र सेना एककासाठी ही बाब अत्यंत अभिमानाची असून, सातत्याने भारतीय सेनेत निवड होणारे छात्रसैनिक घडविल्याबद्दल सर्वांचे कौतुक करण्यात आले.

### शेतातून सोलर पंपाचे कंट्रोलर लंपास

प्रतिनिधी । नंदुरबार

**शेतातून सोलार पंपाचे कंट्रालर चोरीला गेल्याची घटना सारंगखेडा येथे घडली. याप्रकरणी अनोळखीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



शहादा तालुक्यातील सारंगखेडा येथील देवेंद्रसिंग बहादूरसिंग राऊळ यांच्या शेतातून सोलार पंपाचे कंट्रालर चोरीला गेल्याची गेले. चोरट्याने ४० हजार रूपये किंमतीचे कंट्रोलर लांबविले तसेच इलेक्ट्रीक वायरी ताणून तीन सोलर प्लेटांचे नुकसान करण्यात आले आहे. याबाबत देवेंद्रसिंग राऊळ यांनी सारंगखेडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अनोळखीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नंदुरबारात बॅटरीवर चालणाऱ्या कृत्रिम हातांचे वितरण

प्रतिनिधी । नंदुरबार

**दिव्यांग बंधू-भगिनींना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी रोटरी क्लब ऑफ नंदनगरीचे कृत्रिम हात वितरण शिबिर हा स्तुत्य उपक्रम आहे. शासन स्तरावर देखील दिव्यांगाबाबत विविध शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांनी केले. ते रोटरी क्लब ऑफ नंदनगरी आयोजित बॅटरीवर चालणारे यांत्रिकी कृत्रिम हात मोफत वितरण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.**




रोटरी क्लब ऑफ नंदनगरी, रोटरी क्लब ऑफ पुणे डाऊन टाऊन, इनाली फाउंडेशन व अल्टोज टेलिकॉम, रोट्रॅक्ट क्लब ऑफ नंदनगरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बॅटरीवर चालणाऱ्या यांत्रिक कृत्रिम हात वितरण शिबिराचे आयोजन नंदुरबार येथील स्मित मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटक जि.प.चे अधिकारी नमन गोयल होते तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा शिक्षणाधिकारी भानुदास रोकडे, रोटरी पुणे डाऊन टाउन चे गौतम इदनानी, अल्टोज टेलिकॉम चे राजेंद्र पाटील, निलेश भावसार, रोटरी क्लब ऑफ नंदनगरीचे अध्यक्ष विवेक जैन, सचिव राहुल पाटील, प्रोजेक्ट चेअरमन सैय्यद इसरार अली आदी. उपस्थित होते. या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी बोलताना जिल्हा शिक्षणाधिकारी भानुदास रोकडे म्हणाले की, रोटरी नंदनगरीचे कार्य हे नेहमीच उपक्रमशील राहिले आहे. रोटरी नेहमीच समाज उपयोगी उपक्रमाचे आयोजन करीत असते. आरोग्य व शिक्षण या क्षेत्रात देखील रोटरीचे नेहमीच भरीव काम असते.

### देवमोगरा विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद सोनार निवृत्त

प्रतिनिधी । नंदुरबार

तालुक्यातील वसलाई येथील देवमोगरा माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यापक प्रमोद भास्कर सोनार यांचासेवापूर्ती समारंभ नुकताच विद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमोद सोनार, प्रतिभा सोनार यांचा विद्यालयाचे मुख्याध्यापक हिरालाल लिंगायत यांनी शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सपत्नीक सत्कार केला. विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रमोद सोनार यांनी कसे महत्त्वपूर्ण योगदान दिले, यावर हिरालाल लिंगायत, संजय दातीर, हेमंतकुमार पाडवी, दिलीप वळवी, कारभारी पाटील यांनी आपल्या मनोगतातून प्रकाश टाकला.

# आजचे विद्यार्थी हेच उद्याचे खरे शास्त्रज्ञ : सरकारसाहेब रावल

**• शिंदखेडा येथील एन.डी. मराठे माध्यमिक विद्यालयात विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन**

प्रतिनिधी । शिंदखेडा

**आजचे विद्यार्थी हेच उद्याचे खरे शास्त्रज्ञ आहेत, असे प्रतिपादन उद्योजक सरकारसाहेब रावल यांनी केले. शिंदखेडा येथील एन. डी. मराठे माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी श्री.रावल हे बोलत होते. शिक्षण विभाग पंचायत समिती शिंदखेडा तालुका मुख्याध्यापक संघ तालुका विज्ञान व गणित अध्यापक संघ तसेच शैक्षणिक संकुल शिंदखेडा यांच्या संयुक्त विद्यमाने ४६ व्या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.**



कार्यक्रमात मान्यवरांचे लेझीम पथक व ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. तसेच कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. पुढे बोलतांना श्री. रावल म्हणाले की, आजचे विद्यार्थी हेच उद्याचे शास्त्रज्ञ आहेत. त्यांच्यातील कल्पकता देशाला प्रगतीच्या शिखरावर घेऊन जाईल, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष साहेबराव मराठे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी आर. एम. नेतनराव, गटशिक्षणाधिकारी डी. एस. सोनवणे, आगार व्यवस्थापक प्राथमिक किर योगेश्वर शिवदे, शिक्षण विस्तार अधिकारी शैलाजा शिंदे, एस. पी. चौधरी, केंद्रप्रमुख कैलास शिंदे, तालुका मुख्याध्यापक संघाचे सचिव एम.डी. पाटील, के.व्ही. बाविस्कर, एस. एस. गोसावी, जे. डी. भदाणे, विज्ञान व गणित अध्यापक संघाचे अध्यक्ष सुधाकर माळी, उपाध्यक्ष एन. एम. पाटील, बी. पी. देवरे, विज्ञान संघ सचिव ए. टी. पाटील, कार्याध्यक्ष आर. ए. चित्ते आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रदर्शनास तालुक्यातून एकूण १४९ उपकरण मांडण्यात आले. यात प्राथमिक गट ७७ माध्यमिक गट ४९ दिव्यांग विद्यार्थी गट ६ यासह शिक्षक गटातून १६ यासह लॅब टेक्निशियन गटातून तीन उपकरणांची मांडणी करण्यात आली. सदर प्रदर्शन हे शिंदखेडा पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी डी. एस. सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली तर शिंदखेडा तालुका मुख्याध्यापक संघ विज्ञान अध्यापक संघ व एन. डी. मराठे हायस्कूल शिंदखेडा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधाकर माळी यांनी तर सूत्रसंचालन उपशिक्षक एन. एस. सोनवणे यांनी केले. आभार ए. टी. पाटील यांनी मानले.

### गंगामाता विद्यालयात गणित दिन

प्रतिनिधी । धुळे

तालुक्यातील वरखेडी येथील गंगामाता माध्यमिक विद्यालय व नगीनदास पटेल कनिष्ठ महाविद्यालयात थोर गणिततज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती उत्साहात साजरी झाली. या निमित्ताने राष्ट्रीय गणित दिवस साजरा झाला. विद्यार्थ्यांनी विविधांगी गणितीय उपकरणे तयारी केली होती. त्याचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनातील उपकरणांचे परीक्षण एम. आर. महाजन, डी. बी. बोरसे व अमृतकर यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक एस. बी. सोनवणे, पर्यवेक्षक एच. टी. वाघ, प्रा. स्वाती पाटील आदी उपस्थित होते.

# भुसावळमध्ये अनधिकृत बांधकामावर प्रशासनाचा हातोडा

## उपविभागीय अधिकाऱ्यांकडून कलम ५२ व ५३ अंतर्गत नोटीस; ३० दिवसांत कारवाईचे आदेश



प्रतिनिधी । भुसावळ

**येथील जामनेर रोड परिसरातील माऊली प्लाझा सर्वे नं. ११५/१/अ, प्लॉट नं. ०९ वरील इमारतीच्या बांधकामात गंभीर अनियमितता आढळून आल्याने प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. उपविभागीय अधिकारी, भुसावळ यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ व ५३ अंतर्गत संबंधित मालकास नोटीस बजावली आहे.**

सहायक संचालक, नगररचना विभाग, जळगाव यांच्या तपासणी अहवालात सदर इमारतीच्या बांधकामात मंजूर नकाशाचे स्पष्ट उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले आहे. मंजूर आराखड्यानुसार आवश्यक असलेली मोकळी जागा, सामाजिक अंतर, पार्किंग व्यवस्था तसेच रॅम्पची तरतूद करण्यात आलेली नसल्याचे अहवालात नमूद आहे. याशिवाय इमारतीचा वापर परवानगीशिवाय बदलण्यात आला असून, छतावर सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी न घेता मोबाईल टॉवर उभारण्यात आल्याचेही उघड झाले आहे.

नोटिसीनुसार, भोगवटा प्रमाणपत्रातील अटी-शर्तींचे उल्लंघन करून अतिरिक्त व अनधिकृत बांधकाम करण्यात आले असून, हे बांधकाम तात्काळ हटविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

संबंधितांनी ३० दिवसांच्या आत स्वतःहून अनधिकृत बांधकाम काढून टाकावे, अन्यथा महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमातील कलम ५५ व ५६ नुसार प्रशासनामार्फत कारवाई करण्यात येईल आणि त्याचा संपूर्ण खर्च संबंधितांकडून वसूल केला जाईल, असा स्पष्ट इशारा नोटिसीत देण्यात आला आहे.

दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी ही नोटीस बजावण्यात आल्याने शहरातील बांधकाम क्षेत्रात खळबळ उडाली असून, येत्या काळात इतर अनधिकृत बांधकामांवरही कारवाई होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### गारठ्यापासून जळगावकरांना तूर्त दिलासा

प्रतिनिधी । जळगाव

हुडहुडी सारखी थंडी जाणवत असताना तापमानात वाढ झाल्याने शहरासह जिल्ह्यात थंडी काहीशी कमी झाली आहे. गेल्या आठ दिवसांत रात्रीच्या तापमानात ६.६ अंशांची वाढ झाली. शुक्रवारी जळगावचे किमान तापमान १२.६ अंशांवर पोहोचले होते. त्यामुळे थंडीच्या गारठ्यापासून जळगावकरांना तूर्त दिलासा मिळाला आहे. पुढील ६ दिवस तापमान चढते राहणार असल्याचा अंदाज आहे. हवामान विभागाच्या मते उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांचा वेग मंदावला आहे. रात्रीचा पारा अजून एक ते दोन अंशांनी वाढण्याची शक्यता आहे. ३१ डिसेंबर व १ जानेवारी रोजी पारा घसरताच राहिल.

## थोडक्यात

### भुसावळ ते श्रीक्षेत्र शिर्डी ६ रोजी पालखी सोहळा

**भुसावळ ।** शहरातील श्री साई मित्र मंडळातर्फे वरणगाव रोडवरील गोलाणी कॉम्प्लेक्स येथून ६ जानेवारी रोजी सकाळी ७.३० वाजता शोभायात्रेने सुरूवात होणार असून दुपारी १२ वाजता श्रीक्षेत्र शिर्डी येथे पदयात्रा पालखी रवाना होणार आहे. पालखी सोहळ्याचे यंदा १७ वर्ष असून पालखी पदयात्रेत सहभागी होता येत नसल्यास त्यांनी सहपरिवार शोभयायात्रेत सहभागी व्हावे, असे आयोजकांनी सांगितले. दि. ६ रोजी गोलाणी कॉम्प्लेक्स येथे सकाळी ६.३० वा.श्री साईबाबा मुर्तीचा अभिषेक, ७वा. श्री साईबाबांच्या पादूकांचे व ध्वजाचे पूजन यानंतर सकाळी ७.३० वा. पालखी शोभायात्रा निघणार आहे. शहरातून सुंदर नगर, १५ बंगला, शिवाजी नगर, मार्गे पालखी दुपारी १२ वाजता श्रीक्षेत्र शिर्डीकडे प्रस्थान करणार आहे.

### बामणोद हायस्कूलमध्ये निसर्ग निवास शिबिर

**यावल ।** दि. २६ आणि २७ डिसेंबर या दोन दिवसाचे स्काऊट गाईडचे निसर्ग निवास शिबिर आयोजित करण्यात आले होते शिबिराच्या स्काऊट गाईडच्या ध्वजाचे ध्वजारोहण पी एस एम एस स्कूल बामणोद हायस्कूलचे मुख्याध्यापक व प्राचार्य श्री आर एस अडकमोल सर यांनी केले तसेच अध्यक्षस्थानी प्रागतिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉक्टर एन व्ही कोल्हे व व्हाईस चेअरमन देविदास विठ्ठल तळले हे उपस्थित होते त्याचप्रमाणे श्री आर एस अडकमोल सर यांनी विद्यार्थ्यांना स्काऊट म्हणजे काय याविषयी माहिती दिली तरुणांना शिस्त नेतृत्व सेवा व निसर्गावर प्रेम करण शिकवणारी एक जागतिक चळवळ म्हणजे स्काऊट होय स्काऊटच्या विद्यार्थ्यांनी सदैव तत्पर राहावे.

# पाल येथे पक्षीमित्र संमेलनाचे उद्घाटन



प्रतिनिधी । रावेर

**तालुक्यातील पाल येथे सकाळी चातक निसर्ग संवर्धन संस्था यांच्या पाचव्या उत्तर महाराष्ट्र पक्षी मित्र संमेलनाचे उद्घाटन संपन्न झाले. वनप्रशिक्षण केंद्राच्या वास्तूत सलीम अली सभागृहात, मारुती चितमपल्ली व्यासपीठावर माजी आ.शिरीष चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत संमेलनाध्यक्ष डॉ. विनोद भागवत, उद्घाटक वनप्रशिक्षण केंद्राचे संचालक हेमंत शेवाळे आणि अन्य मान्यवरांच्या साक्षीने उद्घाटन झाल्यावर आयोजक संस्था चातक निसर्ग संवर्धन संस्थेचे अध्यक्ष अनिल महाजन महाजन यांच्या छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.**

उद्घाटक शेवाळे यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात वनक्षेत्र प्रशिक्षणाच्या वतीने आयोजित संमेलनाचे महत्व आणि उपयुक्तता सांगितली. माजी आमदार शिरीष चौधरी यांनी निसर्गाच्या संवर्धनाचे कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संघटनांच्या कार्याचे कौतुक करून केव्हाही सहकार्य करण्याची तयारी दाखवली.

संमेलनाचे अध्यक्ष डॉ. विनोद भागवत यांनी पक्षी निरीक्षण, वनराई संवर्धनाच्या कामात सातत्य ठेवण्याचे आवाहन करून होणारा कोणताही विरोध किंवा अडचणींनी निराश न होता संघटितपणे संवाद साधून पुढेच जाण्याची तयारी ठेवावी, यश येतेच असा विश्वास व्यक्त केला. या संमेलनात अनेक शोध कार्यांची माहिती, निरीक्षणे, नोंदी अशा उपक्रमांमधून उपस्थित लोकांचे नैसर्गिक, पर्यावरणीय उद्बोधन होणार, असे संमेलनाच्या आयोजन समितीच्या सूत्रांकडून कळते. वनविभाग आणि चातक निसर्ग संवर्धन संस्था वरणगाव तसेच अन्य अशासकीय संस्थांच्या निसर्गप्रेमी व्यक्तींच्या सहभागातून संपन्न होत असलेले हे संमेलन जनतेत निसर्ग, पर्यावरण संवर्धनाच्या संदर्भात मौलिक जागृती निर्माण करेल असे अनेकांच्या अभिप्रायातून व्यक्त झाले. यावेळी राज्यभरातून १५० अभ्यासक उपस्थित होते.

# राष्ट्रीय ग्राहकदिनानिमित्त ग्राहकांचे हक्क, कर्तव्याबाबत केले प्रबोधन

प्रतिनिधी । पारोळा

**यावर्षीच्या डिजिटल न्यायाद्वारे कार्यक्षम आणि वेगवान निपटारा या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय ग्राहक दिन येथे उत्साहात साजरा करण्यात आला. तहसील कार्यालयाच्या सभागृहात पुरवठा विभाग, तहसील कार्यालय यांच्या वतीने बुधवारी या कार्यक्रमाचे आंयोजन करण्यात आले होते.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारोळा तहसीलदार डॉ. उल्हास देवरे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पुरवठा निरीक्षण अधिकारी शिवकुमार निरगुडे, तालुका कृषी अधिकारी पी.व्ही.निकम, पोलीस निरीक्षक अशोक पवार, स्टेट बँकेच्या व्यवस्थापक सुकेशनी गेडाम, गोदाम व्यवस्थापक अनिल चौधरी, ॲड कृतिका आफ्रे, भूपेंद्र मराठे, मनोज जैन, दिगंबर पाटील, विलास वाणी, चंद्रशेखर जैन, केशव क्षत्रिय, गुणवंतराव पाटील, कैलास सोनवणे, दिलीप पाटील, ॲड. विक्रम कैलास पवार, दीपक पिले आदी उपस्थित होते. यावेळी शिवकुमार निरगुडे, कृतिका आफ्रे, मनोज जैन, डॉ. शांताराम पाटील, दिगंबर पाटील यांनी ग्राहकांचे हक्क, कर्तव्ये व संरक्षण याबाबत उपस्थितांना प्रबोधन केले. जागतिक ग्राहक दिनानिमित्त ग्राहक व विक्रेता यांच्यातील कायदेविषयक माहिती सविस्तर सांगितली.

यावेळी ग्राहक कल्याण फाउंडेशन, अखिल भारतीय ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे पदाधिकारी, स्वस्त धान्य दुकानदार व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी डॉ उल्हास देवरे यांनी यावर्षीच्या संकल्पनेवर सविस्तर मार्गदर्शन माध्यमांद्वारे ग्राहक तक्रारींचे जलद व प्रभावी निवारण कसे होऊ शकते, याची माहिती दिली. यांनी ग्राहकांचे हक्क, कर्तव्ये व संरक्षण याबाबत उपस्थितांना प्रबोधन केले. या कार्यक्रमातून ग्राहकांमध्ये जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय अमृतकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉक्टर उल्हास देवरे यांनी केले.

यावेळी कार्यक्रम यशस्वीतेसाठी भूषण पाटील कैलास माळी वंदना वाणी व कम चाऱ्यांनी परिश्रम घेतले यावेळी रेशन दुकानदार हिंगलाज ७७७४९१ संघटनेचे अध्यक्ष दिनकर पाटील उपाध्यक्ष राजेंद्र पाटील सदस्य माधवराव पाटील डॉक्टर सांगळे गोपाल महाजन यशवंत नाना पाटील केके पाटील योगेश रोकडे चंद्रकांत पाटील भगवान महाजन दिवाणजी खानोरे दिलीप मालपुरे आदी उपस्थित होते.

### हृदयनाथ मोरे यांना डॉ.आंबेडकर फेलोशिप

प्रतिनिधी । अमळनेर

येथील सामाजिक कार्यकर्ते हृदयनाथ मोरे यांना भारतीय दलित साहित्य अकादमी, दिल्ली यांच्या मार्फत दिला जाणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप पुरस्कार २०२५ नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. फुले, शाहू, आंबेडकर, बहुजन विचारधारेचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना हा पुरस्कार देण्यात येतो

# किसान महाविद्यालयात युवतींसाठी कार्यशाळा

प्रतिनिधी । पारोळा

येथील किसान महाविद्यालयात शनिवारी रासेयो एकक आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी युवती आरोग्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. व्ही. पाटील, प्रमुख पाहुणे डॉ. डी.बी.साळुंखे तथा प्रमुख मार्गदर्शिका समाजसेविका हर्षाली महाले आणि कविता राजपूत होत्या. प्रास्ताविक डॉ. अनिता मुडावदकर यांनी मांडले. तरूणींमध्ये मासिक पाळीबाबत सजगता निर्माण करणे आणि महिलांच्या आरोग्य समस्यांवर चर्चा करणे हा सदर कार्यशाळा घेण्यामागील उद्देश होता. हर्षाली माने यांनी मार्गदर्शनपर मनोगतातून मासिक पाळी समज गैरसमज व समस्या, सॅनिटरी पॅडचा योग्य वापर यावर तर कविता राजपूत यांनी विविध टप्प्यातील लसीकरण, संतुलित आहार आणि पुरेसा व्यायाम यावर विचार मांडलेत.

सुत्रसंचालन शितल चौधरी तर आभार साक्षी पाटील या विद्यार्थीनींनी मांडलेत. प्रा.कल्पना निकुंभे, प्रा.आशा बोरसे व प्रा.कोयल पाटील यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परीश्रम घेतले.

# पिंपळगाव हरे येथे पोलिस पाटलांचे वार्षिक इन्स्पेक्शन

प्रतिनिधी । पाचोरा



**तालुक्यातील पिंपळगाव हरे. पोलीस स्टेशन येथे दि. २७ डिसेंबर रोजी पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व पोलीस पाटील यांचे वार्षिक इन्स्पेकेशन आयोजित करण्यात आले होते.**

पाचोरा उपविभागीय पोलीस अधिकारी, पाचोरा उपविभाग, बापू रोहम, पिंपळगाव पोलीस स्टेशनचे। पोलीस उपनिरीक्षक कल्याणी वर्मा, पीएसआय विठ्ठल पवार, प्रकाश पाटील आदी अधिकारी उपस्थित होते. सर्व प्रथम पोलीस पाटील यांचे मार्फत मंचावरील सर्व पोलीस अधिकारी यांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, त्यानंतर पोलीस उपविभागीय अधिकारी यांनी गावनिहाय पोलीस पाटील यांचे दप्तर तपासणी केली. त्यावेळी पोलीस पाटील यांच्या गावातील काही अडीआडचणी, समस्या जाणून घेतल्या. त्यानंतर उपविभागीय अधिकारी बापू रोहम यांनी पोलीस पाटील यांना मार्गदर्शन आणि सूचना ना केल्या. त्यामध्ये हेल्मेट विषयी महत्व सांगितलं. प्रत्येक गावातील पोलीस पाटील यांनी आवर्जून मोटर सायकल चालवीताना हेल्मेटचा वापर केला पाहीजे. कारण पोलीस पाटील हे गावातील प्रमुख व्यतिमत्व असते, त्यांनी जर आवर्जून हेल्मेटचा वापर केला तर त्यांचे अनुकरण गावातील इतर लोक करतील. हल्ली प्रत्येक घरात ७ते ८ हजार रुपयांचे दोन तीन मोबाईल फोन सहज आढळून येतात. त्यांना दर महिन्याला ४०० ते ५०० रुपये रिचार्जसाठी सहज खर्च होतात. परंतु लोकं हजार रुपये किमतीचे हेल्मेट वापरण्यास टाळाटाळ करतात. हल्ली दरवर्षी हजरोच्या संख्येने अपघात होत आहेत, त्यात अनेक लोक जीवानीशी जातात. तर काही अपघाताने हात, पाय गमावून बसतात.

### अंचळगाव येथे आरोग्य तपासणी शिबिर

प्रतिनिधी । भडगाव

तालुक्यातील अंचळगाव येथे आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपरखेडचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतीक भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य पथक तयार करून नागरिकांची तपासणी करण्यात आली. शिबिरात बीपी, एचबी, लिक्विड प्रोफाइल यांच्यासारख्या आरोग्य तपासण्या करण्यात आल्या आणि आवश्यकतेनुसार औषधोपचारही करण्यात आला. तसेच नेमीयामुक्त भारत मोहिमेंतर्गत रक्तशय असलेल्या नागरिकांना फॉलिक ॲसिडच्या गोळ्या वाटप करण्यात आल्या. शिबिरात सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामस्थांसह उपस्थित होते.

# प्रा.डॉ.सुषमा तायडे यांना 'नारीरत्न' पुरस्कार



प्रतिनिधी । धरणगाव

येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात कार्यरत असलेल्या, जळगाव येथे स्थायिक प्रा. डॉ.सुषमा विश्वरत्न तायडे/अहिरे यांना वसुनंदिनी फाउंडेशन संचलित एम.के.व्हेचर्स, जामनेर या सामाजिक संस्थेच्या वतीने राष्ट्रीय पुरस्कार २०२५ चे राष्ट्रीय शिक्षण भूषण आणि नारीरत्न पुरस्कार सन्मानचिन्ह, पदक आणि सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी उपकुलसचिव प्राचार्य डॉ. सुमित पांडे हे होते. उद्घाघाटक साहित्यिक ऋतुजा केळकर, प्रमुख पाहुणे म्हणून महिला उद्योजिका आरोग्य सल्लागार शामली वाघ, ज्येष्ठ लेखिका कवयित्री तथा निवृत्त प्राचार्य हेमलता गीते, शर्मिला नलावडे, राजेंद्र कानडे, उपस्थित होते. वसुनंदिनी फाउंडेशन अध्यक्ष विद्याधर सोनवणे आणि एम.के. व्हेंचर्स अध्यक्ष माधुरी कुलकर्णी यांनी या सोहळ्याचे आयोजन केले.

# दहिगाव येथील आदर्श विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात

## मुंबई, कोकण दर्शनसह देहू, आळंदी, शनिशिंगणापूर आदी प्रेक्षणीय स्थळांना दिल्या भेटी

प्रतिनिधी । यावल


**तालुक्यातील दहिगाव शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षाची आदर्श विद्यालयाची शैक्षणिक सहल मुंबई दर्शनसह कोकण दर्शन आणि देहू, आळंदी, शनिशिंगणापूर इत्यादी प्रेक्षणीय स्थळांना विद्यार्थ्यांनी भेट देऊन क्षेत्रभेट भौगोलिक नैसर्गिक विविध तेजा तसेच आधुनिक मुंबई शहराला भेट देऊन देशाची आर्थिक राजधानी अनुभवली. एकूण सहल पाच दिवसांची होती. त्यात तीन मुक्काम होते.**



यामध्ये मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया, हाजी मलंग दर्गा नेहरू तारांगण इत्यादी पाहिल्यानंतर कोकणातील अलिबाग बीज तसेच नगाव बीच काशीद बीच रेवदंडा, गणपती मुरुड, जंजिरा किल्ला, रायगड किल्ला जेव्हा आळंदी छत्रपती संभाजी महाराज समाधी शनिशिंगणापूर या प्रेक्षणीय स्थळांना भेट दिल्यानंतर पाचव्या दिवशी दहिगाव येथे सुखरूप परतले. तत्पूर्वी दि. १६ रोजी निघालेल्या सहलीचे संस्थेचे अध्यक्ष सुरेश पाटील, ज्येष्ठ संचालक राजाराम महाजन, मनोहर महाजन, माजी मुख्यध्यापक एसडी चौधरी, मुख्याध्यापक पी. पाटील या मान्यवरांनी सहलीला जाणाऱ्या बसचालकांचा रुमाल टोपी व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून प्रवासाला शुभेच्छा दिल्या. सहलीचे नियोजन समिती प्रमुख अजय पाटील, सदस्य एस. एस. सोनवणे, निशा पाटील, एस.बी. तडवी यांनी केले. सहल यशस्वीतेसाठी ज्येष्ठ शिक्षक एम.आर.महाजन, व्ही. व्ही. पाटील, मीना तडवी यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. सहलीतील विद्यार्थ्यांना पूर्ण आनंद आणि नवीन क्षेत्राची ओळख व्हावी म्हणून डी.जे. ठाकरे यांनी पाटील, के.ए. अहिरे, एन. डी. पाटील, एस. आर. चौधरी, सविता महाजन यांनी बहुमोल सहकार्य केले. हरिश्चंद्र महाजन, शशिकांत पाटील यांनी परिश्रम घेतले. महाराष्ट्र शासन राज्य परिवहन मंडळाच्या एकूण तीन बसेस होत्या. त्यात एकूण १२० विद्यार्थी आणि १२ शिक्षक सहभागी होते. सहलीच्या बसेसला निरोप देताना आणि बसमध्ये विद्यार्थ्यांचे व्यवस्थापन नियोजनासाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# चोपड्यात 'व्यवस्था आहे पण शिक्षण नाही' विषयावर आज व्याख्यान

प्रतिनिधी । चोपडा



विवेकानंद प्रतिष्ठान व संशोधन केंद्र संचलित विवेकानंद विद्यालय, चोपडा येथे 'व्यवस्था आहे पण शिक्षण नाही' या विषयावर रविवार, दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४.३० वाजता होणाऱ्या या व्याख्यानात कोल्हापूर येथील ज्येष्ठ विचारवंत, लेखक व अभ्यासक डॉ. सुनीलकुमार लवटे मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या शिक्षणपद्धतीवर डॉ. लवटे आपल्या अभ्यासपूर्ण मांडणीतून प्रकाश टाकणार आहेत. या उपक्रमाचा लाभ विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच शिक्षणप्रेमी नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विकास हरताळकर, उपाध्यक्ष घनश्याम अग्रवाल, सचिव ॲड. रवींद्र जैन, सहसचिव डॉ. विनीत हरताळकर व संपूर्ण संचालक मंडळाने केले आहे.